नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०३/२०२६ (शुक्रवार )**

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ०८ गोवंश जनावरांची सुटका, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १२/०३/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बायपास चौक येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान  झेनॉन ग वाहन क्रं एमएच ०४ एफ यु ९४६९ हे वाहन मिळुन आले. सदर वाहन चालकास थांबवण्याचा इशारा केला असता वाहन चालकाने पोलीसांचे वाहन पाहुन वाहन न थांबविता नागपुर च्या दिशेने भरधाव वेगाने निघुन गेला. पोलीसांनी वाहनाचा पाठलाग केला. बाबा सावजी चौक, नागपुर रोड येथे सदर वाहन पलटी झाल्याचे दिसले. नमुद वाहन चालक पळुन गेला परंतु पोलीसांनी आरोपी नामे छोटु शेख रशीद शेख, वय ३७ वर्ष, रा बैल बाजार धर्मापुर, ता. भिवापुर पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०८ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून झेनॉन वाहन क्रं एमएच ०४ एफ यु ९४६९ किंमती ४,००,०००/— रूपये आणि ०८ गोवंश जनावरे किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण ४,४०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध कलम ११(१) (ड) (ई)(फ) प्राण्यांना निर्दयतेने वाहतुक प्रतीबंधक अधिनियम, सहकलम ५ (अ) (१) (९) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अल्पवयीन बेपत्ता मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर येथे दिनांक ३१/०३/२०२५ रोजी अप क्र २८५/२०२५ कलम १३७(२),१४३ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन बेपत्ता मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी, वय १६ वर्षे हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोशि पन्नालाल बटाउवाले त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. नमुद गुन्हयातील बेपत्ता मुलीचा गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने शोध घेवुन सदर मुलगी तिच्या मैत्रिणीसोबत उसतोड मजुरीसाठी सातारा जिल्ह्यात गेली असल्याची माहीती प्राप्त केली. सदर मुलीला तांत्रिक पुराव्यावरून दिनांक १२/०३/२०२६ रोजी मनसर येथुन ताब्यात घेतले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत.

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई ५ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १२/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ३१४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे सचीन रघूविरसींग टाक, वय ३१ वर्षे, रा शेडेश्वर ता. उमरेड, ता जि नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे ईश्वर रामदास निमावत, वय ३५ वर्ष, रा. मेंटपांजरा, ता.काटोल याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे योगेश पुरूषोत्तम वाढवे, वय ३० वर्ष, रा. वार्ड न. ०३, ग्रामपंचायत चे मागे वडोदा, ता.कामठी, जि नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद , **पोलीस**

**स्टेशन खापा** येथे आरोपी नामे रावजी मोहन परतेकी वय ३५ वर्ष रा सिंदेवानी ता सावनेर जि नागपूर याचेवर आणि महीला आरोपी हीचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद आहे. अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ५ गुन्हे दाखल केले आहे.

**१) २१ लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती २) २३४० मिली देशी दारू असा एकुण ३१४०/— रूपयांचा मुद्देमाल मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने